महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १२५ वे | दिनांक : २९/०४/२०२६ | वार बुधवार

# एकनाथ शिंदे सरकारच्या निर्णयावर देवेंद्र फडणवीस सरकारचा ब्रेक



**मुंबई :** राज्यातील तलाव संवर्धन प्रकल्पांबाबत सरकारने मोठा निर्णय घेत १४ प्रकल्पांची प्रशासकीय मान्यता रद्द केली आहे. पर्यावरण आणि हवामान बदल विभागाने हा आदेश जारी केला असून या विभागाची जबाबदारी मंत्री पंकजा मुंडे यांच्याकडे आहे. विशेष म्हणजे, हे प्रकल्प मागील सरकारच्या कार्यकाळात मंजूर झाले होते. यामध्ये एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना मंजूर केलेल्या ११ प्रकल्पांचा समावेश आहे, तर उर्वरित ३ प्रकल्प महाविकास आघाडीच्या काळात मंजूर झाले होते.

या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. सत्ताधारी पक्षातीलच सहकारी असलेल्या एकनाथ शिंदे यांच्या काळातील प्रकल्पांवर कारवाई केल्याने भाजपनेच शिंदेंच्या निर्णयावर पाणी फेरले का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. याशिवाय, या प्रकल्पांसाठी वितरित करण्यात आलेला निधी व्याजासह परत वसूल करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. त्यामुळे हा निर्णय केवळ प्रशासकीय नसून राजकीयदृष्ट्याही महत्त्वाचा मानला जात आहे.

रद्द करण्यात आलेल्या प्रकल्पांमध्ये अनेक जिल्ह्यांचा समावेश आहे. एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात मंजूर झालेले प्रकल्प लातूरमधील मुक्तेश्वर समतानगर आणि औसा तलाव, रायगडमधील कर्जत येथील वडप तलाव, बीड जिल्ह्यातील परळी येथील परंपोक तलाव, अलिबागमधील बेलोशी तलाव तसेच जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव परिसरातील कळमळू, विसापूर, देवळी आणि ब्राह्मणशेवगे या तलावांचा समावेश आहे. या ११ प्रकल्पांचा एकूण अंदाजित खर्च सुमारे २४४.१५ कोटी रुपये होता. त्यापैकी ७३.३१ कोटी रुपये आधीच वितरित करण्यात आले होते.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात आदित्य ठाकरे यांच्या कार्यकाळात मंजूर झालेले तीन प्रकल्प देखील रद्द करण्यात आले आहेत. यामध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील लांजा येथील ओझर तलाव, मुंबईतील एरगल तलाव आणि नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी येथील खंबाळे तलाव यांचा समावेश आहे. या प्रकल्पांचा अंदाजित खर्च ३५९९ कोटी रुपये होता, तर यासाठी १८ कोटी रुपये वितरित करण्यात आले होते. सर्व १४ प्रकल्पांची तत्त्वतः मान्यता रद्द करताना निधी परत मिळवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

हे प्रकल्प रद्द करण्यामागे काही तांत्रिक आणि प्रशासकीय त्रुटी कारणीभूत असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी सुकाणू समितीची बैठक झाली होती. या बैठकीत तलाव संवर्धन योजनेअंतर्गत मंजूर प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. त्यात पाच प्रस्ताव राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार तयार करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले. तसेच उर्वरित नऊ प्रकल्पांमध्ये अर्ज सादर केल्यानंतर दोन वर्षांहून अधिक काळ उलटून गेला, तरी सुधारीत अहवाल सादर करण्यात आले नव्हते. या गंभीर त्रुटींमुळे प्रकल्प रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला.

दरम्यान, राज्यात तलाव संवर्धन प्रकल्पांची सुरुवात २००६-०७ मध्ये करण्यात आली होती. जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, गाळ काढणे, प्रदूषण नियंत्रण, पाण्याचा प्रवाह सुरळीत ठेवणे आणि स्थानिक परिसंस्था जपणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. हे प्रकल्प मुख्यतः महानगरपालिका आणि नगर परिषदांमार्फत राबवले जातात. स्थानिक स्वराज्य संस्था सरकारकडे प्रस्ताव सादर करतात आणि त्यानुसार निधी मंजूर केला जातो. आता या प्रकल्पांच्या रद्दीकरणामुळे भविष्यातील धोरणांवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## आंबेडकर चळवळीतील घटक एकत्र न आल्यास पक्षविस्तार करणार - रामदास आठवले



**पुणे :** केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय) चे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांनी म्हटले आहे की, जर आंबेडकर चळवळीतील सर्व घटक एकत्र येत नसतील, तर आपल्या पक्षाचा वेगाने विस्तार करणे हेच मुख्य उद्दिष्ट आहे. आंबेडकरी समाज सर्व गटांनी एकत्र यावे अशी इच्छा बाळगून आहे आणि त्यासाठी अनेक प्रयत्नही झाले आहेत, असे आठवले यांनी पुणे येथे आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले.

या पत्रकार परिषदेला आरपीआयचे शहराध्यक्ष संजय सोनवणे, उपमहापौर परशुराम वाडेकर, मातंग आघाडीचे प्रदेश अध्यक्ष अण्णा वायदंडे, मोहन जगताप, शाम सदाफुले, बसवराज गायकवाड, शशिकला वाघमारे, प्रवीण ओव्हाळ, विशाल शेळके, राजेश गाडे, ऋषिकेश गवळी, संजय खडसे, सुनिल जाधव आणि सुधीर वाघमोडे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

आठवले यांनी सांगितले की, रिपब्लिकन पक्ष हा सर्व समाज घटकांना एकत्र आणणारा पक्ष आहे. पक्षाला राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. छत्रपती संभाजीनगर येथील सामाजिक कार्यकर्ते रमेश अण्णा मुळे यांनी आरपीआयमध्ये प्रवेश केला असून, त्यांच्यावर पक्षाच्या मराठा आघाडीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. मुळे यांच्या माध्यमातून मराठा आणि दलित समाजाला एकत्र जोडण्याचा पक्षाचा प्रयत्न राहील, असे आठवले यांनी स्पष्ट केले.

स्वातंत्र्यानंतर समाजात मोठे परिवर्तन झाले असून, संविधानामुळे समाज एकसंध राहिला आहे. त्यामुळे भारतात नेपाळ किंवा बांगलादेशसारखी अराजकाची स्थिती निर्माण होऊ शकत नाही, असे आठवले म्हणाले. सामाजिक स्तरावर जातीभेद स्पष्टपणे दिसत नसले तरी, काही ठिकाणी दलितांवर अत्याचाराच्या घटना अजूनही घडत आहेत. त्यामुळे संपूर्ण सामाजिक परिवर्तनासाठी देशातील प्रत्येक नागरिकांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे, अशी अपेक्षा आठवले यांनी व्यक्त केली.

देशभरात पक्षविस्तारासाठी प्रयत्नशील असतानाही, महाराष्ट्रात रिपब्लिकन पक्षाला सत्तेत पुरेसे प्रतिनिधित्व मिळालेले नाही, अशी खंत आठवले यांनी व्यक्त केली. त्यांनी विधान परिषदेची एक जागा, दोन महामंडळाचे अध्यक्षपद आणि विविध महामंडळांमध्ये 50 सदस्य आरपीआयला मिळावेत, अशी आग्रही मागणी केली.

आठवले यांनी काही महत्त्वाच्या मागण्याही केल्या. पुणे येथील आंबेडकर भवनच्या पाठीमागील जागा स्मारकासाठी देण्याच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आश्वासनाची त्वरित पूर्तता करावी, अशी त्यांची मागणी होती. तसेच, कोरेगाव भीमा येथील विजय स्तंभाजवळ विजय स्मारकासाठी सरकारकडून 200 एकर जागा उपलब्ध करून द्यावी, असेही ते म्हणाले.

विजय स्तंभाच्या जागेची पाहणी राज्याच्या समाज कल्याण विभाग आणि जिल्हाधिकारी कार्यालयाकडून झाली आहे. शेतकऱ्यांना योग्य मोबदला देऊन स्मारकासाठी जागा अधिग्रहित करावी, असे आठवले यांनी यावेळी सांगितले.

धम्मचक्र दिनी १४ ऑक्टोबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे काही काळ वास्तव्य असलेल्या सातारा येथून सामाजिक समरसता मार्च काढण्यात येणार असून तो महाराष्ट्रभर जाईल आणि त्याचा समारोप पुण्यात करण्यात येईल, असेही आठवले यांनी नमूद केले. सातारा येथे डॉ आंबेडकर यांच्या मातोश्रींचे स्मारक उभारले जावे, अशी मागणीही त्यांनी केली. चवदार तळ्याच्या शताब्दी वर्षानिमित्त पक्षाच्यावतीने राज्यभरात वर्षभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे, असेही आठवले यांनी सांगितले.

# राज्यपालांच्या हस्ते भारतीय विद्यापीठ संघाच्या महासभेचे उद्‌घाटन

**पुणे :** महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते पिंपरी येथील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठात 'असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज्' (AIU) च्या 100 व्या वार्षिक महासभेचे आणि कुलगुरूंच्या राष्ट्रीय परिषदेचे उद्‌घाटन झाले. ही परिषद 28 ते 30 एप्रिल 2026 या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. परिषदेचा मुख्य विषय "ज्ञान आणि नाविन्यपूर्ण संशोधनाच्या माध्यमातून आत्मनिर्भर भारताला आकार देणे" हा आहे. यावेळी बोलताना राज्यपाल वर्मा यांनी नवोन्मेष, संशोधन आणि सर्वसमावेशक शिक्षणातूनच 'विकसित भारत' घडवता येईल, असे प्रतिपादन केले. प्रगतीचे फायदे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचले पाहिजेत, असेही ते म्हणाले.

विद्यार्थ्यांनी केवळ ज्ञानार्जन न करता समाजात संधी निर्माण करणारे आणि समस्या सोडवणारे सक्षम नागरिक बनावे, असे आवाहन राज्यपालांनी केले. 'विकसित भारत 2047' च्या प्रवासात नवोपक्रम आणि संशोधन केंद्रस्थानी असेल, असे सांगत त्यांनी 'जय जवान, जय किसान' ते 'जय विज्ञान' आणि 'जय अनुसंधान' या प्रवासात विद्यापीठांनी पुढाकार घेण्याचे महत्त्व अधोरेखित केले. उच्च शिक्षणात 50 टक्के प्रवेश प्रमाण गाठण्याचे उद्दिष्ट ठेवतानाच, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि प्रगत तंत्रज्ञानाचा समावेश शिक्षणात करण्यावर त्यांनी भर दिला. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करत त्यांनी सामाजिक मूल्यांची आठवण करून दिली. भारतीय विद्यापीठ संघाच्या या शताब्दी परिषदेसाठी देशभरातून 300 हून अधिक कुलगुरू, शैक्षणिक क्षेत्रातील दिग्गज, आंतरराष्ट्रीय प्रतिनिधी आणि धोरणकर्ते एकत्र आले आहेत. डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या वतीने पाहुण्यांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, प्र-कुलपती डॉ. भाग्यश्री पी. पाटील, डॉ. सोमनाथ पी. पाटील, प्र-कुलगुरू डॉ. स्मिता जाधव आणि विश्वस्त डॉ. यशराज पाटील यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २९ एप्रिल २०२६


## घोडेस्वारांनी आंबेडकरी चळवळ प्रवाहीत ठेवून कार्यकर्तेही घडवले - कवी वा. ना. आंधळे

**भुसावळ :** सत्तर ते नव्वदच्या दशकात आंबेडकरी चळवळीचे केंद्र म्हणून भुसावळ ओळखले जायचे. ही चळवळ निरंतर प्रवाहीत ठेवून कार्यकर्ते घडवण्याचे काम स्वर्गीय दिलीप घोडेस्वार यांनी केले. बुद्ध धम्माचा निस्सीम अनुयायी म्हणून ते ख्यातकीर्त राहिले. त्यांची साहित्य साधना अफाट आहे, अशी भावना एरंडोलचे कवी वा. ना. आंधळे यांनी येथे व्यक्त केली. भुसावळच्या श्रीकृष्णचंद्र सभागृहात रविवारी प्रज्ञा हंसराज बागुल यांनी एकदिवसीय आशादीप साहित्योत्सव आयोजित केला होता. त्यात अध्यक्षस्थानावरून कवी आंधळे हे बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. मिलिंद बागुल, प्रवीण कांबळे, प्रा. गौतम निकम, कवयित्री पुष्पा साळवे, सुमंगल अहिरे, सुरेश भालेराव, डॉ. भारत सातपुते यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते उत्कृष्ट कथासंग्रह, कवितासंग्रह, कादंबरी, ललित लेखनाला पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. आंबेडकरी चळवळीचे लेखक कवी स्मृतीशेष दिलीप घोडेस्वार यांच्या पाचव्या स्मृतिदिनानिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यांची कन्या प्रज्ञा बागुल यांच्या 'संदर्भ जगण्याचे' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. 'हा काव्यसंग्रह मानवी जीवनाचे भावभावनांचे कंगोरे उलगडणारा आहे. किंबहुना, बापाप्रती कृतज्ञतेची भावना त्यातून व्यक्त होते' असे मत डॉ. सातपुते यांनी मनोगतातून व्यक्त केले. कार्यक्रमाचे रसाळ सूत्रसंचालन मुंबईच्या कविता मोरवणकर यांनी केले. यशस्वीतेसाठी आशा घोडेस्वार, प्रज्ञा बागुल, सविता घोडेस्वार, पुजा घोडेस्वार व परिवाराने परिश्रम घेतले.चळवळ घराघरात पोहोवली...लेखक दिलीप घोडेस्वार यांच्या लेखणीतून प्रसवलेले साहित्य समाजाला प्रेरणा देणारे आहे. सत्तर ते नव्वदच्या दशकात त्यांनी चळवळीच्या अनुषंगाने देशभरात प्रकाशित होणारे साहित्य खान्देशात पोहोचवण्यासाठी महत्वाची भूमिका निभावली आहे. म्हणूनच तर व्रतस्थ कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख आहे. समाजजीवनात वावरताना प्रतिकूलता त्यांना कधीच आडवी आली नाही. स्वाभिमान कधीच डगमगला नाही. नम्रतेची कास त्यांनी सोडली नाही. त्यांचा हाच वारसा कन्या प्रज्ञा बागुल या समर्थपणे पुढे नेत आहेत, अशी भावना कवी आंधळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून व्यक्त केली. घोडेस्वार हे चळवळ जगले....कवी, लेखक दिलीप घोडेस्वार हे आयुष्याच्या अखेरच्या श्वासापर्यंत चळवळ जगले. आंबेडकरी विचारांशी त्यांनी कधीच फारकत घेतली नाही. आंबेडकरी विचारांचे वाहक म्हणून त्यांनी उमेदीचा काळ खर्ची घातला. पद, प्रतिष्ठा, पैसा या गोष्टींना त्यांनी कधीच महत्व दिले नाही. नागपूरपासून ते मुंबईपर्यंत त्यांच्या नावाचा आदरयुक्त दबदबा होता. भुसावळला त्यांच्या सेवाभावी कार्यामुळे वेगळी ओळख मिळाली. सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, पत्रकारीता अशा विविध क्षेत्रात त्यांचा मित्रमेळा होता. माणसं जोडण्याची कला त्यांना अवगत होती, असे नागपूरचे लेखक प्रवीण कांबळे यांनी नमूद केले. वडीलांचा वारसा पुढे नेतेय.....चळवळीत काम करीत असलेल्या वडीलांमुळे अनेक सेवाव्रतींचा सहवास कुटुंबाला लाभला आहे. त्यांनी लिहिलेली साहित्य संपदा जीवापाड जपून ठेवली आहे. त्यांचे जे अप्रकाशित साहित्य आहे ते हळूहळू प्रकाशित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी दिलेल्या बाळकडूच्या बळावरच वेगवेगळ्या भाषेत लिखाण करण्यावर भर दिला आहे. आशादीप साहित्योत्सवाच्या माध्यमातून त्यांच्या आठवणींना उजाळा देण्याचा प्रयत्न करण्यात आला. भविष्यात कविसंमेलन, चर्चासत्र, परिसंवाद असे विविध कार्यक्रम घेण्याचा मानस आहे. भुसावळांनी दिलेले प्रेम शब्दातीत आहे, असे मत प्रज्ञा बागुल यांनी व्यक्त केले.

## हेच आहेत भविष्यातील पॉलिसी मेकर - डॉ. अब्दुल करीम सालार




**जळगाव :** येणाऱ्या 10 वर्षांत मी या चिमुकल्या मुलांमध्ये देशाचे भविष्यकालीन प्रशासकीय अधिकारी, नोकरशहा आणि धोरणकर्ते पाहत आहे, अशा शब्दांत इकरा शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष डॉ.अब्दुल करीम सालार यांनी आपला विश्वास व्यक्त केला. अलफैज फाउंडेशन तर्फे आयोजित 'महाराष्ट्र उर्दू स्कूल्स कॉम्पिटिटिव्ह प्रिपरेटरी एक्झाम' (मिशन UPSC) या राज्यस्तरीय परीक्षेत इकरा पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या घवघवीत यशानंतर ते बोलत होते.या परीक्षेत इयत्ता सातवीचा विद्यार्थी अस्जद अली जावेद अली याने जळगाव तालुक्यात दुसरा क्रमांक पटकावून शाळेचा नावलौकिक वाढवला आहे.सोबतच माज शेख तनवीर (7वी) (176 गुण),उमैर साजीद खान (नववी) (234 गुण) आणि शेख उमेर फारुख (11वी) (140 गुण) यांनी आपापल्या गटात शालेय स्तरावर प्रथम क्रमांक पटकावून आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल मुख्याध्यापक शेख शकील आणि सर्व शिक्षक वृंदाने त्यांचे अभिनंदन केले आहे.

## जुन्या जिंतूर शहराला बसस्थानकाशी थेट जोडणाऱ्या नवीन पूल व रस्त्याची मागणी



**जिंतूर (बी. डी. रामपूरक) :** शहरातील जुन्या भागाला थेट बसस्थानकाशी जोडणारा नवीन पूल व रस्ता उभारण्यात यावा, अशी मागणी नगरसेवक योगेश काशीकर यांनी परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्यमंत्री ना. मेघना दीदी बोर्डीकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.अलीकडेच जिंतूर येथे आयोजित करण्यात आलेल्या जनता दरबारात हे निवेदन सादर करण्यात आले. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात वारंवार निर्माण होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेता, त्यावर प्रभावी उपाय म्हणून हा प्रस्ताव मांडण्यात आला आहे.नगरसेवक योगेश काशीकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, जिंतूर शहरातील आतार गल्ली, संत सावता महाराज मंदिराजवळून जाणाऱ्या जुन्या कटारे पादन रस्त्यावर तसेच नाल्यावर नवीन पूल व रस्ता उभारल्यास कसबा पेठ, भुजंगवाडी, कोठेकर गल्ली, पठाण मोहल्ला, कुरेशी मोहल्ला, उस्मानपुरा, धोबी गल्ली, आतार गल्ली, पोस्ट ऑफिस परिसर, बौद्ध नगर, मच्छी मार्केट आणि कादरी प्लॉट या भागातील हजारो नागरिकांना थेट बसस्थानकाशी जोडले जाईल. सध्या या परिसरातील नागरिकांना बसस्थानकात जाण्यासाठी मोठा वळसा घ्यावा लागतो. परिणामी छत्रपती शिवाजी महाराज चौकात मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी निर्माण होते. नवीन पूल व रस्ता उभारल्यास ही समस्या मोठ्या प्रमाणात कमी होऊन नागरिकांचा वेळ, श्रम आणि वाहतूक खर्च वाचणार आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून या भागातील नागरिकांकडून या पूल व रस्त्याची मागणी सातत्याने होत असून, आता तरी ही प्रलंबित मागणी पूर्ण व्हावी, अशी अपेक्षा सर्वसामान्य नागरिक व्यक्त करत आहेत.हे निवेदन नगरसेवक योगेश काशीकर तसेच श्रीकांत टाकळकर यांच्या मार्फत पालकमंत्री मेघना दीदी बोर्डीकर यांना देण्यात आले.


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २९ एप्रिल २०२६


## जिंतूर सह सम्पूर्ण राज्यात श्री वासवी माता जन्मोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** : आर्य वैश्य समाजाची कुलस्वामिनी वासवी कन्यका परमेश्वरी मातेचा २५११ वा जन्मोत्सव मोठ्या उत्साहाने जिंतूर परभणी गंगाखेड नांदेड सह मुंबई नागपूर चंद्रपूर सोलापूर पुणे सम्भाजीनगर लातूर यवतमाळ अमरावती गडचिरोली वर्धा परभणी या जिल्ह्यातील तालुक्यासह सम्पूर्ण राज्यात साजरा करण्यात आला. महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेच्या माध्यमातून सम्पूर्ण राज्यात संघटन मजबूत झाले असून अनेक ठिकाणी श्री वासवी माता मंदिराची उभारणी होत आहे तर २१ जिल्ह्यातील जिल्हा कार्यकारिणी पदाधिकारी व सर्व तालुका ठिकाणी महिला व पुरुष मंडळींनी शोभयात्रे त सहभाग नोंदवून श्री वासवी माता जन्मोत्सव सोहळा साजरा केला शोभायात्रा अनेक ठिकाणी आकर्षक ठरली, भव्य दिव्य शोभायात्रेत आर्य वैश्य समाजातील महिला, पुरुष, नागरिक लहान बालके मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. एवढ्या मोठ्या प्रमाणात भव्य दिव्य जन्मोत्सव साजरा होण्याची महाराष्ट्रातील एकमेव घटना होय. अनेक ठिकाणी . ढोल ताशे, संगीत,भजन, टाळकरी वारकरी आपली पारंपारिक नृत्य सादर करून उपस्थिताची मने जिंकली. जन्मोत्सव साजरा करण्यात आल्याने समाजात एक मोठे मजबूत संघटन निर्माण झाल्याची प्रचित आली असे महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेचे अध्यक्ष नंदकुमार गादेवार यांनी म्हंटले तर महासचिव गोविंदराव बिडवई ,कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर महाजन, राज्य संघटन प्रमुख प्रदीप कोकडवार यांनी समाज बांधवांचे आभार मानले अशी माहिती महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेचे माजी राज्य प्रसिद्धीप्रमुख नरेंद्र येरावार यांनी दिली आहे

## सेवा हक्क अधिनियम आदर्श, पारदर्शक व विद्यार्थी-केंद्रित शिक्षण व्यवस्था निर्माण करेल




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : शिक्षण ही केवळ ज्ञानाची प्रक्रिया नाही, तर ती एक व्यवस्थित आणि पारदर्शक प्रणाली आहे. या प्रणालीत विद्यार्थ्यांना विविध शासकीय व महाविद्यालयीन सेवा वेळेत मिळणे अत्यंत आवश्यक असते. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सेवा हक्क अधिनियम २०१५ महत्त्वाची भूमिका बजावतो. या अधिनियमामुळे महाविद्यालयीन प्रशासन अधिक जबाबदार आणि शिस्तबद्ध झाले. प्रत्येक कामासाठी जबाबदार अधिकारी निश्चित असतो. सेवा वेळेत न दिल्यास त्याच्यावर दंडाची तरतूद असल्यामुळे कामात गती आणि प्रामाणिकपणा येतो. विद्यार्थ्यांसाठी हा कायदा म्हणजे एक हक्काचा आधार आहे. विद्यार्थी अधिक सक्षम बनतात.अशाप्रकारे सेवा हक्क अधिनियम २०१५ मुळे महाविद्यालयात पारदर्शकता वाढेल, प्रशासनावर विश्वास निर्माण होईल आणि हा अधिनियम विद्यार्थी-केंद्रित शिक्षण व्यवस्था निर्माण करेल असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी केले. येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात २८ एप्रिल हा दिवस सेवा हक्क दिन म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र शासनाच्या वतीने सेवा हक्क अधिनियम २०१५ च्या दशकपूर्ती निमित्त शपथ वाचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. अस्वले यांनी महाराष्ट्र सेवा हक्क अधिनियम सविस्तरपणे स्पष्ट केला. यावेळी अंतर्गत गुणवत्ता नियंत्रण कक्षाचे समन्वयक डॉ विनोद देवकर यांनी शपथ वाचन केले. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. पी ए पिटले, पर्यवेक्षक प्रा शैलेश महामुनी, प्रभारी प्राध्यापक डॉ. ए एस पदमपल्ले, प्रबंधक राजकुमार सोनवणे, कार्यालयीन अधीक्षक नितीन कोराळे, महाविद्यालयातील विभाग प्रमुख, प्राध्यापक, प्राध्यापिका आणि कार्यालयीन तसेच शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


### जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |


## ओढ तुझ्या भेटीची

चातकाप्रमाणे मला,
भेटीची लागली आस.
भेट तुझी होताच,
मी होईन तुझा दास. 1

भेटीसाठी तुझ्या,
डोळे माझे शिणले.
स्वप्नात तुझ्यासोबत,
संसार माझे विणले. 2

ओढ तुझ्या भेटीची,
सखी लागली मनाला.
भेटत असतांना तुला,
घाबरत नाही जनाला. 3

भेट तुझी माझी होता,
खिळतील सर्वांच्या नजरा
सर्वांसमक्ष तुझ्या वेणीत,
माळणार आहे मी गजरा. 4

तुझ्या भेटीच्या ओढीने,
उत्साहीत मी झालो.
तुला भेटण्यासाठी,
सर्वांना सोडून आलो. 5



**नागेश बोंतेवाड**
**छत्रपती संभाजीनगर**

## एसटी च्या हंगामी दरवाढीमुळे सर्वसामान्य प्रवाशांच्या खिशाला लागणार कात्री

**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** : महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील हजारो कुटुंबांचा उदरनिर्वाह हा मोठ्या शहरांवर अवलंबून आहे. पुणे, मुंबई, नाशिक आणि संभाजीनगर यांसारख्या शहरांत मजुरी अथवा नोकरीसाठी गेलेले अनेक कामगार, कर्मचारी व लहान उत्पन्न गटातील नागरिक सुट्ट्यांच्या काळात आपल्या गावी परत येतात. मात्र, याच काळात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) कडून करण्यात आलेली हंगामी तिकीट दरवाढ त्यांच्या आर्थिक अडचणींमध्ये भर टाकणारी ठरत आहे. उन्हाळी सुट्ट्यांच्या पार्श्वभूमीवर एसटी महामंडळाने यावर्षी सुमारे 10 टक्के तिकीट दरवाढ लागू केली असून ही वाढ 15 एप्रिल ते 15 जून या कालावधीत लागू आहे. याशिवाय प्रत्येक तिकिटावर 2 रुपयांचा स्वच्छता अधिभारआकारला जात आहे. ही भाडेवाढ तात्पुरती असली तरी तिचा फटका मात्र थेट सर्वसामान्य प्रवाशांच्या खिशावर बसत आहे. खेड्यापाड्यातील गोरगरीब कुटुंबातील सदस्य वर्षभर कष्ट करून शहरात काही पैसे साठवतात आणि सुट्टीच्या काळात आपल्या नातेवाईकांना भेटण्यासाठी गावाकडे येतात. पण वाढीव भाड्यामुळे त्यांचा प्रवासच महाग झाला आहे. एकट्या व्यक्तीचा नव्हे, तर संपूर्ण कुटुंबाचा प्रवास करताना ही वाढ मोठ्या आर्थिक ओझ्यात रूपांतरित होते. परिणामी, अनेकांना आपल्या गावी येण्याचा निर्णयही पुढे ढकलावा लागत असल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे, "बहुजन हिताय, बहुजन सुखाय" हे ब्रीदवाक्य घेऊन सुरू झालेल्या एसटी महामंडळाकडूनच अशा प्रकारे दरवाढ करून सामान्य जनतेवर आर्थिक भार टाकला जात असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. सणासुदीच्या काळात - विशेषतः दिवाळी व उन्हाळी सुट्ट्यांमध्ये दरवाढीची परंपरा सुरू ठेवून महामंडळ जणू "अल्पजन सुखाय, बहुजन दुखाय" असे धोरण राबवत असल्याची टीका प्रवासी वर्गातून होत आहे. दरवाढीबरोबरच बसमधील स्वच्छतेच्या प्रश्नावरही प्रवासी नाराजी व्यक्त करत आहेत. अनेक बसमध्ये अस्वच्छता, खिडक्यांच्या बाजूला साचलेली घाण, गुटखा तंबाखूचे डाग, अन्नाचे अवशेष असे चित्र दिसते. अशा परिस्थितीत प्रवाशांकडून स्वच्छता अधिभार वसूल करणे म्हणजे अन्यायकारक असल्याची भावना व्यक्त होत आहे.

दरम्यान, शाळा-महाविद्यालयांना सुट्टया लागल्यामुळे विद्यार्थी, शिक्षक, कुटुंबांसह प्रवास करणारे नागरिक, तसेच तीर्थयात्रा व पर्यटनासाठी जाणारे लोक यांची संख्या वाढलेली आहे. अशा वेळी दरवाढ लागू केल्याने आनंदावर पाणी फिरल्याचे दिसून येते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २९ एप्रिल २०२६


## भारताची जनगणना २०२७ : डिजिटल युगातील पहिली जनगणना

**फे**ब्रुवारी २०२७. यात वय, लिंग, शिक्षण, व्यवसाय, स्थलांतर, जन्मदर यांसारखी वैयक्तिक माहिती नोंदवली जाईल.३. जात जनगणनेचा समावेश१९३१ नंतर प्रथमच जनगणनेत जातीची गणना केली जाणार आहे. आतापर्यंत फक्त अनुसूचित जाती आणि जमातींचीच गणना होत होती.४. तंत्रज्ञान आणि सुरक्षा₹११,७१८.२४ कोटींचा खर्च. सुमारे ३० लाख गणक कर्मचारी. Census Management & Monitoring System द्वारे प्रत्यक्ष वेळेत देखरेख. माहितीच्या सुरक्षेसाठी Critical Information Infrastructure अंतर्गत विशेष डेटा सेंटर उभारले आहेत.ब्रीदवाक्य : "जनगणना से जन कल्याण"म्हणजेच जनगणनेतून जनकल्याण. अचूक आकडेवारीमुळे अन्न, पाणी, वीज, रस्ते, आरोग्य, शिक्षण यांसारख्या क्षेत्रांचे नियोजन करता येते. सरकारी योजना योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यास मदत होते.महाराष्ट्रातील स्थितीमहाराष्ट्रातही गणक आणि पर्यवेक्षकांची नियुक्ती सुरू झाली आहे. लवकरच प्रशिक्षण दिले जाईल. बीडसह सर्व जिल्ह्यांमध्ये हा उपक्रम राबवला जाईल.ही जनगणना भारताच्या सामाजिक आणि आर्थिक नियोजनाचा पाया ठरेल. प्रत्येक नागरिकाने यात सहभाग घेऊन अचूक माहिती द्यावी, असे आवाहन सरकारने केले आहे.



**भगवंत पाळवदे,**
**अंबाजोगाई**

## सांगाडा बँकेत : व्यवस्थेच्या अमानुषतेचा उघडा पडलेला चेहरा

**पु**रावा म्हणून स्वतःच्या मृत बहिणीचा सांगाडा बँकेत घेऊन जाणाऱ्या ओडिशातील आदिवासी व्यक्तीचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. हा केवळ एक प्रसंग नाही; तो जात-वर्ग-पुरुषसत्ताधारी व्यवस्थेच्या संवेदनाहीनतेवर बसलेली थेट, सणसणीत चपराक आहे. ही घटना ‘सबका साथ, सबका विकास’च्या पोकळ घोषणांना, योजनांच्या गजराला आणि तथाकथित ‘समावेशक प्रगती’च्या दाव्यांना निर्वस्त्र करते.तुम्ही अर्थव्यवस्था 5 ट्रिलियन डॉलरची करण्याच्या गप्पा मारा, जनधन योजनेअंतर्गत प्रत्येकाच्या नावावर बँक खाते उघडल्याचा डंका पिटा पण त्या खात्यांपर्यंत माणूस पोचतोय का? त्याला न्याय, सन्मान आणि किमान मानवी वागणूक मिळतेय का? हा मूलभूत प्रश्न आहे. कागदोपत्री समावेशन आणि प्रत्यक्षातील बहिष्कृतीकरण यातील दरी एवढी भयावह आहे की, एका माणसाला स्वतःच्या बहिणीचा सांगाडा उचलून व्यवस्थेच्या दारात न्यायची वेळ येते. याहून मोठं अपयश कोणतं?प्रस्थापित व्यवस्थेच्या झारीत बसलेले ‘शुक्राचार्य’ शासन प्रशासनाची निष्क्रियता, उदासीनता आणि असंवेदनशीलता हेच या शोकांतिकेचं मूळ आहे. 'गरिबांना (मागसलेल्यांना) वेगळा न्याय आणि श्रीमंतांना वेगळा न्याय ' सत्यता लक्षात न घेता नियमांच्या नावाखाली माणुसकी गहाण ठेवणारी ही व्यवस्था बदलल्याशिवाय कोणतीही योजना, कोणताही विकास केवळ दिखावा ठरतो.“ही फक्त दाखवून विसरण्याची बातमी नाही; ती व्यवस्थेच्या अपयशाचा पुरावा आहे.” जर अजूनही बोध घेतला गेला नाही, तर सांगाडे खांद्यावर घेऊन व्यवस्थेच्या दारात उभं राहणं हा अपवाद नाही ते या व्यवस्थेच जळजळीत सत्य आहे. आता तरी या व्यवस्थेला शाळा महाविद्यालयातून समतावादी संविधानिक शिक्षणाचे आशय शिकवा, मानवतावाद शिकवा; अन्यथा, विकासाच्या प्रत्येक दाव्यावर अशीच चपराक बसत राहील, आणि इथे माणूसच नव्हे तर माणुसकीही रोज ठेचली जाईल.

**प्रभाकर गायकवाड**
**छत्रपती संभाजीनगर**

## छत्रपती संभाजीनगर मनपात १० स्वीकृत सदस्यांना प्रमाणपत्र



**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिका मुख्यालयातील प्रशासकीय समिती सभागृहात आज नामनिर्देशित स्वीकृत सदस्यांना प्रमाणपत्र वितरणाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात १० नवीन स्वीकृत सदस्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

या कार्यक्रमास महापौर समीर राजूरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ आणि स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांची प्रमुख उपस्थिती होती. महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांच्या हस्ते स्वीकृत सदस्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

प्रमाणपत्रांसोबतच स्वीकृत सदस्यांना महापालिकेची सेरेमोनियल कॅप, शाल आणि सभागृह कामकाज व नियमावलीवर आधारित पुस्तक भेट म्हणून देण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्वीकृत सदस्यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. महानगरपालिकेच्या विकासकामांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवून नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी कार्य करावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002